**विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय,**
**१७, डॉ. आंबेडकर मार्ग , लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.**
दुरध्वनी क्र.०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं-०२०-२६१२२२१७
ई-मेल आय डी क्र- **dydpune@gmail.com** वेब साईट- **www.dydepune.com**

---

**महत्वाचे** जा.क्र.शिउसं/पुवि/उमाशि ३/२०१५—१६/ ८४०८
दिनांक :— 19 MAY 2016

प्रति,
सर्व प्राचार्य/मुख्याध्यापक,
क.म.वि. व माध्य शाळा,
पुणे व पिंपरी चिंचवड शहर परिसरच पुणे.

विषय :— ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१६—१७ मधील कला व सांस्कृतिक प्रमाणपत्र प्रमाणित करणे बाबत व आरक्षणाबाबत...

संदर्भ :—
१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन परिपत्रक क्र. प्रवेश २०१४/प्र.क्र.८१/एसडी—२ दिनांक २३ मे, २०१४
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. न्यायाप्र/२०१५/(६१/१५) एसडी दिनांक २८ मार्च, २०१६

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता ११ वी चे शैक्षणिक वर्ष २०१६—१७ मधील प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहेत. त्या दृष्टिने विद्यार्थ्यांना इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासाठी दिनांक १६ मे, २०१६ पासून वेबसाईट उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांचा प्रवेश अर्जाचा भाग १हा मुख्याध्यापकांनी/मार्गदर्शन केंद्रावर झोनप्रमुखांनी/संपर्क प्रमुखांनी (सामाजिक विशेष आरक्षणाच्या बाबतीत) अप्रुव्हल करण्याची प्रक्रिया करावयाची आहे.

कलेच्या क्षेत्रातील इ ११ वी प्रवेश मिळण्यासाठी राखीव ठेवलेल्या २ टक्के जागांकरीता प्रमाणपत्र प्रमाणित करुन देण्याबाबत शासनाने संदर्भित शासन निर्णयान्वये अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या शासनमान्य संस्थेकडून संगीत, नृत्य व नाटय क्षेत्रात परिक्षा उत्तीर्ण/प्राविण्य प्रमाणपत्र मिळविलेले विद्यार्थी/सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित राज्य नाटय/बालनाटय/व्यावसायिक नाटय स्पर्धेत अभिनयाचे पारितोषिक मिळविलेले विद्यार्थी/राज्य/केंद्र अथवा आंतरराष्ट्रीय स्तरावर चित्रपट पुरस्कार मिळविलेले विद्यार्थी यांच्या प्रमाणित यादयांची सॉफ्ट कॉपी पाठविली आहे. सदर यादी प्रमाणे कलेच्या क्षेत्रातील इ ११ वी तील प्रवेश मिळविण्यासाठी राखीव ठेवलेल्या जागांकरीता प्रमाणपत्र प्रमाणित करुन घेण्याची आवश्यकता नसल्याचे कळविलेले आहे. आता मुख्याध्यापकांनीच संबंधित विद्यार्थ्यांचे यादीत नांव समाविष्ट असल्यास त्यांच्याकडील प्रमाणपत्र पाहून मुख्याध्यापकांच्या लॉगीन आयडी पासवर्ड नुसार विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन प्रवेश अर्जाचे अप्रुव्हल करावयाचे आहे. विद्यार्थ्यांच्या यादया **http:/pune.fyjc.org.in** या संकेत स्थळावरील **Applicant & Parents** या शीर्षकामध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. तसेच **www.dydepune.com** या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या <u>www.dydepune.com</u> या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

MRaut 19.5.16
(मिनाक्षी राऊत)
सचिव
इ.११वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
सहा. शिक्षण संचालक,
पुणे विभाग, पुणे ०१